**RNI No. MAHBIL /2009/35530**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

**वर्ष १०, अंक २१(६)] मंगळवार, ऑक्टोबर १५, २०२४/आश्विन २३, शके १९४६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००**

**असाधारण क्रमांक ५३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८.**—महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, २०२१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. | **पृष्ठे** १–३ |


**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,

दिनांक १५ ऑक्टोबर २०२४.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XVIII OF 2024.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STATE SKILLS UNIVERSITY ACT, 2021.

**सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८.**

**महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, २०२१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

२०२१ चा महा. ७. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, २०२१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या पूर्ण शीर्षकामध्ये सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, २०२१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या पूर्ण शीर्षकामधील, "महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ" या मजकुराऐवजी, "रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ" हा मजकूर दाखल करण्यात येईल. २०२१ चा महा. ७.

सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या उद्देशिकेमध्ये सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या उद्देशिकेमधील, "महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ" या मजकुराऐवजी, "रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम १ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ" या मजकुराऐवजी, "रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम २ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये, खंड (यध) मधील, "महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ" या मजकुराऐवजी, "रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये, पोट-कलम (१) मधील, ""महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ"" या मजकुराऐवजी, ""रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ "" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (२) मधील, "महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ" या मजकुराऐवजी, "रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## निवेदन

उच्च कौशल्य असलेले व रोजगारक्षम युवक, इत्यादी निर्माण करण्याकरिता आणि उद्योगांना, नोकरीसाठी तयार असलेले मनुष्यबळ पुरविण्याकरिता आणि त्याद्वारे बेरोजगारी कमी करून अंतिमतः राज्याच्या आर्थिक वाढीस चालना देण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी, या प्रकारचे पहिलेच विशेषीकृत विद्यापीठ असलेले, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, महाराष्ट्र राज्यामध्ये स्थापन करण्यासाठी व विधिसंस्थापित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, २०२१ (२०२१ चा महा. ७) अधिनियमित केला आहे.

२. श्री. रतन टाटा यांनी, भारताच्या अभिवृद्धीसाठी कौशल्य विकासाच्या महत्त्वावर सातत्याने भर दिला होता. त्यांनी, विशेषतः, ज्या क्षेत्रांमध्ये भारताला आव्हानांचा सामना करावा लागत आहे अशा वस्तूनिर्मिती व तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण व कौशल्य वाढ करण्याच्या गरजेचा पुरस्कार केलेला आहे. जागतिक अर्थव्यवस्थेच्या मागण्यांशी अनुरूप भारतीय मनुष्यबळाचे कौशल्य उंचावण्याचे ध्येय असलेल्या नवोपक्रमांना त्यांनी पाठींबा दिला आहे. तरुणांना, तांत्रिक व व्यावसायिक कौशल्य संपादन करणे शक्य व्हावे म्हणून, त्यांच्या प्रशिक्षणावर भर देण्यासाठी त्यांनी टाटा समुहाच्या टाटा स्ट्राइव्ह सारख्या उपक्रमांद्वारे प्रयत्न केले आहेत.

राष्ट्राच्या विकासासाठी कौशल्य विकास, कौशल्य शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण व सामाजिक सुधारणा या क्षेत्रातील श्री. रतन टाटा यांचे बहुमोल व अनुकरणीय कार्य विचारात घेऊन, महाराष्ट्र शासनाने, "महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, २०२१" या नावात बदल करून, त्यास, "रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, २०२१" असे नाव आणि "महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ" या नावात बदल करून, त्यास, "रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ." असे नाव देण्याचे ठरविले आहे. उक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, २०२१ यामध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, २०२१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई, **सी.पी.राधाकृष्णन,**

दिनांक १५ ऑक्टोबर २०२४. महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**गणेश पाटील,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.